**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ व नियम २००६ अन्वये संरक्षण अधिकारी घोषित करणेबाबत.**

**महाराष्ट्र राज्य**
**महिला व बाल विकास विभाग,**
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२००७/प्र.क्र.३०६/का-२,
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक: २६ ऑक्टोबर, २००७

**वाचा :-** १) शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग, क्रमांक संक्रीर्ण-२००६/प्र.क्र.२९५/का-२, दि. २१ डिसेंबर, २००६.

२) शासन निर्णय महिला व बालविकास विभाग, संकीर्ण-२००६/प्र.क्र.२९५/का-२, दि. २२ मे, २००७.

३) आयुक्त, महिला व बाल विकास विभाग आयुक्तालय, पुणे यांचे क्र. मबाविआ/ संरक्षण अधिकारी, मुंबई शहर उपनगर / १५४४२/०७-०८, दि.२७.८.२००७ चे पत्र.

**प्रस्तावना :-** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ आणि महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण नियम २००६ दि.२६.१०.२००६ पासून अंमलात आले आहेत. या अधिनियमामधील कलम ८ नुसार संरक्षण अधिकारी नेमण्याची तरतूद आहे. अधिनियमाच्या अंमलबजावणीत महत्वाचा घटक म्हणजे संरक्षण अधिकारी आहे. या कलमानुसार राज्य शासनाने प्रत्येक जिल्हयात एक किंवा अधिक संरक्षण अधिकारी नेमावयाचे आहेत. या तरतूदीनुसार महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२००६/प्रक्र.२९५/का.२, दि.२२.५.२००७ नुसार सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, प्रांत अधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी यांना पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरुपात संरक्षण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. मुंबई शहर जिल्हयामध्ये तालुके नसून मुंबई महानगरपालिके अंतर्गत ९ वॉर्ड आहेत. या जिल्हयात प्रांत अधिकारी, गट विकास अधिकारी व विस्तार अधिकारी ही पदेच नाहीत. दि.२२.५.२००७ च्या शासन निर्णयानुसार ज्यांना संरक्षण अधिकारी म्हणून घोषित केले आहे अशी काही पदे मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयामध्ये उपलब्ध नाहीत त्यामुळे शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संरक्षण अधिकारी मुंबई शहर व उपनगर या जिल्हयामधून नसल्याने तेथे संरक्षण अधिकाऱ्यांची संख्या अपूरी पडते. मुंबई शहर येथे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, तहसिलदार व नायब तहसिलदार अशीच पदे त्या जिल्हयात उपलब्ध आहेत इतर पदे तेथे नाहीत. मुंबई शहराची लोकसंख्या ३३ लाखापेक्षा जास्त असल्याने तेथे संरक्षण अधिकाऱ्यांची सेवा पुरविण्यासाठी अधिक संरक्षण अधिकारी उपलब्ध व्हावेत यासाठी महानगरपालीकेच्या क्षेत्रनिहाय वॉर्डमध्ये कार्यरत असलेल्या समाज विकास अधिकाऱ्यांना

(Community Development Officer) तात्पुरत्या स्वरुपात संरक्षण अधिकारी म्हणून घोषित केल्यास, त्यांच्या संरक्षण अधिकारी म्हणून सेवा उपलब्ध होवू शकतील. तसेच या समाज विकास अधिकाऱ्यांना संरक्षण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आल्यास ते स्थानिक असल्यामुळे त्यांना तेथील रहिवाशांची चांगली माहिती असल्याने तसेच त्यांच्याशी ते नेहमी संपर्कात असल्याने त्यांच्या संपर्काचा व त्यांना असलेल्या समाज कार्याच्या ज्ञानाचा व अनुभवाचा वापर करून ते संरक्षण अधिकारी म्हणून प्रभावीपणे काम करू शकतील. सदर बाब विचारात घेता, मुंबई शहर व मुंबई उपनगर मधील कार्यरत असलेल्या समाज विकास अधिकारी यांना सरंक्षण अधिकारी म्हणून घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम ८(१) नुसार मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्हयांची लोकसंख्या अधिक असल्यामुळे या दोन्ही महानगरपालिकांच्या मुंबई शहर ९ व मुंबई उपनगर १४ क्षेत्रनिहाय अशा एकुण २३ वॉर्डातील सर्व समाज विकास अधिकाऱ्यांना (Community Development Officer) संरक्षण अधिकारी (Protection Officer) म्हणून तात्पुरत्या स्वरुपात घोषित करण्यात येत आहेत. संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्ये, कार्य, जबाबदाऱ्या इ. वरील अधिनियम व नियमामध्ये नमूद केल्याप्रमाणे रहातील.

२. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन्ही महानगरपालिकाचे समाज विकास अधिकारी (Community Development Officer) यांनी त्यांच्याकडे सद्ध्या असलेली कामे सांभाळून या शासन निर्णयानुसार सोपविण्यात आलेली संरक्षण अधिकाऱ्यांची कामे सांभाळावीत. तसेच त्यांच्याकडे असलेल्या मूळ पदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी उपलब्ध असलेल्या कार्यालयीन जागा, आवश्यक साधनसामुग्री व इतर सुविधा यामधून संरक्षण अधिकाऱ्यांची कर्तव्ये, कार्ये व जबाबदाऱ्या पार पाडाव्यात. त्याचप्रमाणे सर्व समाज विकास अधिकाऱ्यांनी कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ च्या तरतूदीनुसार सोपविलेली संरक्षण अधिकाऱ्यांची कामेही त्यांना त्यांच्या मूळ पदाच्या कार्यक्षेत्रातील ज्या वार्ड मधील नियुक्तीने कामे सोपविलेली आहेत, तेवढ्याच कार्यक्षेत्राच्या अधिपत्याखालील त्यांना संरक्षण अधिकारी म्हणून सोपविलेल्या कामाचे मर्यादेत कार्यक्षेत्र राहील. सर्व समाज विकास अधिकारी यांनी त्यांच्या वार्डमध्ये दाखल झालेल्या तक्रार अर्जाची एकत्रित माहितीची आकडेवारी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, मुंबई शहर व मुंबई उपनगर यांना पाठवायी. तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी सदर आकडेवारी एकत्रित करुन आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांना दर महिन्याच्या ५ तारखेपर्यंत पाठवावी. तसेच आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी सर्व जिल्हयांची माहिती संकलित करुन शासनास दर महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवावी.

३. आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांनी संरक्षण अधिकाऱ्यांना त्यांची भूमिका व कर्तव्यांबाबत माहिती व प्रशिक्षण देण्याच्या दृष्टीने त्वरित कार्यवाही करावी.

४. सदर कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ व त्याचे नियम, २००६ हे केंद्रिय महिला व बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या वेबसाईट www.wcd.nic.in वर उपलब्ध आहेत.

५. तसेच सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट www.maha.govn.in वर उपलब्ध आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

स्वा/-

(श. पा. वारे)

उप सचि, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई,

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,

मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,

मा. मंत्री. महसूल विभाग, यांचे खाजगी सचिव,

मा. मंत्री, ग्राम विकास विभाग, वांचे खाजगी सचिव,

मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

मा.राज्यमंत्री, महिला व बाल विकास मांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,

मा सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव मंत्रालय मबई,

मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई, अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मुंबई,

प्रधान सचिव (अपिल य सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,

प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

मुस्लिम, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई,

पोलीस महासंचालक, पोलिस मुख्यालय, मुंबई,

सचिव, महाराष्ट्र राज्य समाजकल्याण सल्लागार बोर्ड, मुंबई,

समन्वयक, महिला व बालकांचे विशेष कक्ष, टाटा सामाजिक विज्ञान संस्थ ४०००८८,

जिल्हाधिकारी, बृहन्मुंबई व मुंबई उपनगर सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई,

व्यवस्थापकीय संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई,

आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, रायगड भवन, नवी मुंबई,

आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

पोलीस विशेष महानिरिवाक, महिला अत्याचार प्रतिबंधक का, पोलीस मुख्यालय, मुंबई,

महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई,

सर्व निबंधक, उच्च न्यायालय, नागपूर/औरंगाबाद,

सर्व जिल्हा न्यायाधिश, जिल्हा न्यायालय,

सर्व मंत्रालयीन विभाग,

बाल विकास प्रकल्प अधिकारी, बृहन्मुंबई / मुंबई उपनगर,

जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, बृहन्मुंबई/ मुंबई उपनगर,
सर्व समाज विकास अधिकारी, महानगरपालिका, मुंबई शहर/मुंबई उपनगर,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी,
सर्व प्रांत अधिकारी,
सर्व तहसिलदार,
सर्व नायब तहसिलदार,
सर्व गट विकास अधिकारी,
सर्व विस्तार अधिकारी,
सर्व उपसचिव/अवर सचिव/ कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
निवड नस्ती, का-२.